लोकमत पू पान क्र. ०१

# मोबाइल मिळताच फुलले हास्य

## पेल्हार पोलिसांनी हरवलेले २० मोबाइल केले नागरिकांना परत

लोकमत न्यूज नेटवर्क

**नालासोपारा :** एकदा मोबाइल हरवला की, तो पुन्हा परत मिळण्याची आशाच सोडून दिली जाते. एवढ्या प्रचंड लोकसंख्येत पोलिस तरी कसा शोध लावणार या निष्कर्षावर नागरिक येतात, पण तंत्रज्ञान एवढे विकसित झाले की, कुठलीही गोष्ट अशक्य नाही. अनेकदा मोबाइल हरवल्यानंतर तो परत मिळण्याची शक्यता कमी असते. ही शक्यता पेल्हार पोलिसांनी खोडून काढली आहे. मंगळवारी सकाळी चोरी, गहाळ झालेले २० मोबाइल पेल्हार पोलिसांनी नागरिकांना परत केले आहे.

पेल्हार पोलिस ठाण्याच्या परिसरात अलीकडे मोबाइल चोरीच्या घटना वाढल्या आहेत. चोरलेला व हरवलेला मोबाइल शोधणे हे पोलिसांसमोर एक मोठे आवाहन असते.



पोलिस उपायुक्त जयंत भजबळे, सहायक पोलिस आयुक्त बजरंग देसाई यांच्या मार्गदर्शनाखाली पेल्हारचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक जितेंद्र वनकोटी, पोलिस निरीक्षक (गुन्हे) कुमारगौरव धादवड, पोलिस निरीक्षक (प्रशासक) शकील शेख आदींच्या पथकाने ही कामगिरी पार पाडली आहे.

पेल्हार गुन्हे प्रकटीकरण शाखेच्या पोलिसांनी लाखो रुपये किमतीचे एकूण २० मोबाइल शोधून काढले. परिमंडळ-३ चे पोलिस उपायुक्त जयंत भजबळे यांच्या हस्ते मंगळवारी सकाळी पोलिस ठाण्यात आयोजित केलेल्या कार्यक्रमात मालकांना परत देण्यात आले. यावेळेस नागरिकांना सायबर गुन्हेगारी, मोबाइल चोरीपासून कसे वाचावे आणि मोबाइल आणि डेटा सुरक्षित कसा करावा याबाबत मार्गदर्शन केले. मोबाइल परत मिळाल्याने अनेकांच्या चेहऱ्यावर समाधान दिसून आले. मोबाइल परत मिळाल्यानंतर लोकांनी पोलिसांचे आभार मानले आहे. गुन्हे प्रकटीकरण शाखेतील पोलिसांनी अथक मेहनत करून मोबाईलचा शोध लावला आहे.

# वाहनावर हात मारून दोघांची अश्लील शिवीगाळ

लोकमत न्यूज नेटवर्क

**मीरा रोड :** मीरा रोडच्या नया नगर, नूपुर गल्ली येथील ओमकार सोसायटीमधील मधू अवस्थी गाडीने जात असताना दोघांनी त्यांच्या गाडीवर हात मारला. त्याचा जाब विचारला असता फैज खालिद खान (२२, रा. नूपुर गल्ली, होली प्लाझा) याने अवस्थी यांना अश्लील शिवीगाळ करत मारहाण केली.

अन्य दोन अनोळखी व्यक्तींनी दुचाकीवरून त्यांच्या गाडीला लाथा मारून नुकसान करत तुला व तुझ्या मुलाला बघून घेऊ, अशी धमकी दिली. अवस्थी यांचा विनयभंग केला. याप्रकरणी दाखल झालेल्या फिर्यादीवरून नया नगर पोलिस ठाण्यात २२ एप्रिलला फैज खान व अन्य दोघांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# २७ व्या वर्षी खून करणारा एकसष्टीत जाळ्यात!

## ३४ वर्षांपासून फरार : अंधेरीतून अटक

लोकमत न्यूज नेटवर्क

**मीरा रोड :** १९९० सालातील मीरा रोड भागातील हत्येच्या फरार आरोपीला मीरा-भाईंदर गुन्हे शाखा १ च्या पथकाने अंधेरी येथून अटक केली आहे.

मीरा रोडच्या मीरा अपार्टमेंटमध्ये २ डिसेंबर १९९० रोजी रात्री दहाच्या सुमारास पार्टी सुरू असताना पूर्वीच्या भांडणाचा राग मनात धरून स्टिव्ह मारवीन नाझरेस डेव्हिड याने अन्य साथीदारांसह गॅब्रियल ऊर्फ सुधाकर क्रिस्टल अमन्ना (वय २२, रा. ब्लॉसम सोसायटी, मरोळ, मिल्ट्री रोड, अंधेरी पूर्व) याची चाकूने वार करून हत्या केली होती. रॉयल ऊर्फ रेनॉल्ड क्रिस्टन अमन्ना यांच्या फिर्यादीवरून काशिमीरा पोलिस ठाण्यात त्यावेळी हत्येचा गुन्हा दाखल करण्यात आला होता.

या गुन्ह्यामध्ये संजय (रा. भांडुप), जहांगीर दिनमोहमद शेख (रा. चिमटपाडा मरोळ मुंबई), संतोष, पास्कोल आणि किशोर हे हत्येच्या गुन्ह्यातील पाहिजे आरोपी आहेत.



### अखेर ठोकल्या बेड्या

- मीरा-भाईंदर गुन्हे शाखा कक्ष-१ चे हवालदार पुष्पेंद्र थापा यांना फरार आरोपी जहांगीर दिनमोहमद शेख (वय ६१) याची माहिती मिळाली.
- उपायुक्त अविनाश अंबुरे व सहायक आयुक्त मदन बल्लाळ यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस निरीक्षक अविराज कुराडे, सहायक निरीक्षक प्रशांत गांगुर्डे व पुष्पराज सुर्वेसह संदीप शिंदे, पुष्पेंद्र थापा, संतोष लांडगेंनी तपास सुरू केला.
- पोलिसांनी शेख याला २२ एप्रिल रोजी सायंकाळी अंधेरी-कुर्ला मार्गावरील चिमटपाडा, देवकी नंदन चाळमधून अटक केली. मीरा रोड भागात खून करून तब्बल ३४ वर्षांपासून शेख अंधेरी भागात उजळ माथ्याने राहत व वावरत होता, परंतु गुन्हे शाखेने तब्बल ३४ वर्षांनंतर आरोपी शेखला बेड्या ठोकल्या.

CamScanner
CamScanner

लोकमत पु पान क्र. ०१

## दुचाकीस्वाराचा अपघाती मृत्यू

**नालासोपारा :** मुंबई-अहमदाबाद महामार्गावर भरधाव ट्रकने दिलेल्या धडकेत दुचाकी चालकाचा मृत्यू झाला. मीरा रोडच्या विनय टॉवरमधील योगेश शहा (वय ५५) सोमवारी दुपारी मुंबई-अहमदाबाद महामार्गावरून दुचाकीने जात असताना न्यू फाउंटन हॉटेलसमोर भरधाव वेगातील हायवा ट्रकने त्यांच्या दुचाकीला ठोकर मारल्याने अपघात झाला. यात योगेश यांना गंभीर दुखापत झाल्याने त्यांचा मृत्यू झाला. याप्रकरणी नायगाव पोलिसांनी आरोपी ट्रक चालक आप्पाराम चव्हाण याच्याविरोधात गुन्हा दाखल केला आहे.

## तरुणीवर बलात्कार



**नालासोपारा :** नालासोपारा शहरात राहणाऱ्या ३५ वर्षीय तरुणीला लग्नाचे आमिष दाखवून तिचा विश्वास संपादन करून वेगवेगळ्या ठिकाणी बोलावून तिच्या इच्छेविरुद्ध वारंवार शारीरिक संबंध केले. तरुणीने आरोपीला लग्नाबाबत विचारल्यावर लग्न करण्यास नकार देऊन फसवणूक केली. आचोळे पोलिसांनी सोमवारी बलात्काराचा गुन्हा दाखल केला आहे.

## पाण्यात पडून तरुणाचा मृत्यू

**नालासोपारा :** पोमण शिलोत्तर येथे राहणारे लैला उर्फ अजित शेख (३०) यांचा पाण्यात पडून बुडून मृत्यू झाला आहे. गुरुवारी ते चिंचोटी सर्व्हे नंबर ३६ येथील खदानीवर अंघोळ करण्यासाठी गेले होते. त्यावेळी तोल जाऊन पाण्यात पडून नाकातोंडात पाणी जाऊन त्यांचा मृत्यू झाला आहे. नायगाव पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद केली आहे.

## लाखोंचे एमडी केले जप्त

**नालासोपारा :** प्रगती नगर येथील जय अंबे अपार्टमेंटसमोरील सार्वजनिक रस्त्यावर शनिवारी रात्री नऊ वाजण्याच्या सुमारास एका व्यक्तीकडून तुळींज पोलिसांनी लाखो रुपयांचा एमडी अमली पदार्थ जप्त केला आहे. आरोपी शाबान आलम (२१) याने स्वतःजवळ ५ लाख ३६ हजार १०० रुपये किमतीचा ५३.६१ ग्रॅम एमडी हा अंमली पदार्थ विक्रीसाठी बाळगलेला आढळून आला आहे. तुळींज पोलिसांनी याप्रकरणी रविवारी गुन्हा दाखल केला आहे.

## अपघातात तरुणाचा मृत्यू



**नालासोपारा :** धानिवबागच्या हरवटेपाडा येथील आदिशक्ती वेलफेअर सोसायटीत राहणाऱ्या विनोद डोंगरे (३२) यांना भरधाव वाहनाने धडक दिल्याने त्यांचा मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. शनिवारी रात्री साडेअकरा वाजण्याच्या सुमारास नायरा पेट्रोल पंपाच्या समोर हा अपघात झाला. पेल्हार पोलिसांनी रविवारी आरोपी वाहनचालकाच्या विरोधात गुन्हा दाखल केला आहे.

CamScanner

लोकमत पू. पान क्र. ०१

## तरुणीने गळफास घेऊन संपवले जीवन

लोकमत न्यूज नेटवर्क

**नालासोपारा :** वाकणपाड्याच्या सीताराम बिल्डिंगमध्ये राहणाऱ्या प्रियाकुमारी गुप्ता (२४) या तरुणीने गळफास घेत आत्महत्या केली आहे.

राहत्या घरातील पंख्याला रविवारी ओढणीच्या साहाय्याने गळफास घेतला. तिला घरच्यांनी प्रथम खासगी रुग्णालयात दाखल केले. तेथील डॉक्टरांनी तपासून मनपाच्या नागिनदास पाड्यातील रुग्णालयात पाठवले. तेथे डॉक्टरांनी तपासून मृत घोषित केले.

# वाहतूक पोलिसाशी वाद; प्रवाशाने केली मारहाण

लोकमत न्यूज नेटवर्क

**नालासोपारा :** वाहतुकीचे नियमन करताना व्हिडीओ शूटिंग करणाऱ्यास विचारणा केल्याच्या रागातून वाहतूक पोलिसाशी वाद घालून मारहाण करणाऱ्याविरोधात तुळिंज पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

तुळिंज फ्लायओव्हर ब्रीजजवळ वाहतूक पोलिस हवालदार प्रवीण रानडे (३३) सोमवारी सकाळी वाहतुकीचे नियमन करीत असताना शैलेश वाघेला (३६) हा रिक्षात बसून त्यांचे व्हिडीओ शूटिंग करत होता. याबाबत विचारणा केली असता शैलशने अरेरावी केली. त्याला तुळिंज पोलिस ठाण्यात नेल्यावरही त्याने पोलिस अंमलदार परजने यांच्यासमक्ष प्रवीण यांना धक्का मारून त्यांची सरकारी वर्दी जोराने खेचून शर्टाची वरील चार बटणे व नेमप्लेट तोडून नुकसान केले. आरोपीने त्यांच्या डाव्या-उजव्या गालावर ठोसा मारल्याने त्यांचे दातही तुटले आहेत.

लोकमत पू. पान क्र. ०३

# दुचाकी, रिक्षाचोर आरोपी जाळ्यात

## चार गुन्ह्यांची केली उकल : तीन दुचाकींसह रिक्षा हस्तगत

लोकमत न्यूज नेटवर्क,

**नालासोपारा :** दुचाकी आणि रिक्षा चोरणाऱ्या मोहम्मद सैयाज मनिहार (२४) याला अटक करण्यात माणिकपूरच्या गुन्हे प्रकटीकरण शाखेच्या पोलिसांना यश मिळाले आहे. पोलिसांनी आरोपीकडून चार गुन्ह्यांची उकल करून २ लाख रुपये किमतीच्या तीन दुचाकी आणि रिक्षा असा मुद्देमाल हस्तगत केल्याची माहिती जनसंपर्क अधिकारी प्रवीण बनगोसावी यांनी मंगळवारी दिली आहे.

नायगांवच्या टीवरी रोडवरील भामनी संकुल येथील दिलीपकुमार मकवाना (वय ४३) यांची नायगाव रेल्वे स्टेशन जवळील सार्वजनिक रस्त्यावर पार्किंग केलेली दुचाकी १६ एप्रिलला चोरीला गेली होती. त्यांच्या तक्रारीवरून माणिकपूर पोलिसांनी वाहन चोरीचा गुन्हा दाखल केला होता.



माणिकपूरच्या गुन्हे प्रकटीकरण शाखेच्या पोलिस अधिकारी व अंमलदारांनी सीसीटीव्ही कॅमेरे, बातमीदार आणि तांत्रिक मदतीने आरोपी मोहम्मद सैयाज मनिहार याला बावशेतपाडा परिसरातून सापळा रचून अटक केली.

### या अधिकारी-कर्मचाऱ्यांनी केली कारवाई

पोलिस उपायुक्त पौर्णिमा चौगुले-श्रृंगी, सहायक पोलिस आयुक्त पद्मजा बडे यांच्या मार्गदर्शनाखाली माणिकपूरचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक राजू माने, पोलिस निरीक्षक (गुन्हे) संतोष चौधरी यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे प्रकटीकरण पथकाचे पोलिस उपनिरीक्षक सनील पाटील, पोलिस हवालदार शैलेश पाटील, शामेश चंदनशिवे, धनंजय चौधरी, प्रवीण कांदे, गोविंद लवटे, आनंदा गडदे, पूजा कांबळे यांनी ही कारवाई केली.


CamScanner

म. टा. पु. पान क्र. ०१

# वसई किल्ल्यातील बिबळ्या अखेर जेरबंद

## तब्बल २५ दिवसांनंतर पकडण्यात यश

म. टा. वृत्तसेवा, वसई



वसई किल्ल्यातील बिबळ्याला पिंजऱ्यात कैद करण्यात वन विभागाला अखेर २५ दिवसांनंतर यश आले आहे. वसई किल्ल्यातील भुयारामध्ये लपलेल्या या बिबळ्याला मंगळवारी पहाटे तीन वाजण्याच्या सुमारास सुरक्षितरित्या पकडण्यात आले आहे. त्यामुळे मागील महिनाभरापासून भीतीच्या सावटाखाली असलेल्या वसई किल्ल्याच्या परिसरातील किल्ला बंदर, पाचूबंदर भागातील नागरिकांनी सुटकेचा निःश्वास सोडला आहे.

वसई किल्ल्यात २९ मार्च रोजी हा बिबळ्या दिसून आला होता. त्यानंतर त्याला पकडण्यासाठी वनविभागाकडून प्रयत्न सुरू होते. वसई किल्ल्यात पर्यटनबंदीही केली होती. स्थानिकांना गरजेशिवाय येथून जाण्यास मज्जाव होता. यामुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. तर रोरोच्या सायंकाळच्या फेऱ्यादेखील कमी केल्या होत्या. वनविभागाकडून वसई किल्ल्यातील अनेक भागात ट्रॅप कॅमेरे, रेस्क्यू पथक, आवश्यक ठिकाणी पिंजरे लावले होते. मात्र तो पिंजऱ्यात सापडत नव्हता. अखेर तब्बल २५ दिवसानंतर मंगळवारी पहाटे तीनच्या दरम्यान बिबळ्या पिंजऱ्यात येऊन अडकला आहे. प्रथमदर्शनी या बिबळ्याला कोणतीही इजा किंवा तो जखमी झाला नसल्याचे दिसून आले. त्याची वैद्यकीय तपासणी करण्यासाठी त्याला बोरिवली येथील संजय गांधी राष्ट्रीय उद्यानात नेण्यात आले. वनविभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांशी चर्चा केल्यानंतर त्याला सोडण्याचे ठिकाण निश्चित करण्यात येणार आहे.

येथील स्थानिक आदिवासींना हा बिबळ्या अनेकदा दिसला होता. त्याची एक झलक पाहण्यासाठी सायंकाळच्या वेळी आदिवासी नागरिक उत्सुक असायचे. वसई किल्ल्यात तो फिरायचा.

बिबळ्या हा लाजाळू प्राणी असल्याने या दरम्यान त्याने कोणत्याही मानवावर हल्ला केला नाही, असे हार्दिक सोनी यांनी सांगितले. या सर्व बचावकार्यात स्थानिक नागरिकांनी सहकार्य केले तर कुलदीप वर्तक यांच्यासह इतरांनी दिवसरात्र मदत केल्याचे सोनी म्हणाले.

### कसे पकडले?

मांडवी वनविभाग यांना मदतीसाठी डहाणू येथील वाईल्ड लाईफ कन्झर्वेशन अँड अॅनिमल वेल्फेअर असोसिएशन आणि ठाणे येथील वाईल्ड लाईफ वेल्फेअर असोसिएशन हे कार्यरत होते. बिबळ्याला पकडण्यासाठी या दोन्ही सामाजिक संस्थांकडून कॅमेरे लावण्यापासून बिबळ्यावर प्रत्यक्ष नजर ठेवणे असे काम करण्यात यायचे. एकूण १५ कॅमेरे किल्ल्यात लावण्यात आले होते. या माध्यमातून त्याच्यावर सकाळ, सायंकाळ नजर ठेवण्यात येत होती. या दरम्यान त्यांना बिबळ्याच्या हालचाली या सायंकाळी ७ नंतर आणि सकाळी ६ च्या आधी होत असल्याचे कॅमेरामधून दिसून येत होते. दिवसातून चार वेळा तो कॅमेरामध्ये कैद व्हायचा. शेवटचे चार दिवस तो सलग वसई किल्ल्यातील भुयारामध्ये जाताना दिसून आला. टॉर्चने पहिले असता तो भुयारात लगेच दिसून आला. यासाठी त्याला पकडायला भुयाराच्या दोन्ही टोकाला पिंजरे लावून त्यात चिकन लावण्यात आले होते. अखेर मंगळवारी पहाटे तो या पिंजऱ्यात सुरक्षित कैद झाल्याचे पालघर जिल्ह्यातील मानद वन्यजीव रक्षक आणि वाईल्ड लाईफ कन्झर्वेशन अँड अॅनिमल वेल्फेअर असोसिएशनचे हार्दिक सोनी यांनी सांगितले.

CamScanner

लोकसत्ता पृ. पान. क्र. ०१

# महामार्गावरील जलसंकट दूर होणार

## महापालिका, महामार्ग प्राधिकरणाचा कृती आराखडा

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी

**वसई :** पावसाळ्यात जलमय होणाऱ्या महामार्गावराची समस्या सोडविण्यासाठी महापालिका आणि महामार्ग प्राधिकरणाने कृती आराखडा तयार केला आहे. यासाठी १४ प्रमुख ठिकाणे शोधण्यात आली असून तेथे उघाड्या तयार करणे, नाल्यांची रुंदी वाढवणे, पाणी जाण्याचे मार्ग तयार करणे आदी प्रमुख कामे केली जाणार आहे. नुकताच महापालिका आणि महामार्ग प्राधिकरणाच्या अधिकाऱ्यांच्या संयुक्त पथकाने महामार्गाची पाहणी करून उपाययोजनांचे नियोजन केले.

मुंबई-अहमदाबाद राष्ट्रीय महामार्ग वसई, विरार तसेच पालघर जिल्ह्यातून जातो. दररोज हजारो वाहने या मार्गावरून ये-जा करत असतात. गेल्या काही वर्षांपासून महामार्ग पावसाळ्यात पाण्याखाली जाऊ लागला आहे. महामार्गाला तलावाचे स्वरूप प्राप्त होऊन वाहतूक तासनतास ठप्प होत असते. येत्या पावसाळ्यात ही समस्या उद्‌भवू नये यासाठी महापालिका, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण यांनी एक कृती आराखडा तयार केला आहे. नुकताच संयुक्त पाहणी दौरा त्यांनी केला. आयुक्त अनिलकुमार पवार यांच्या मार्गदर्शनाखाली अतिरिक्त आयुक्त संजय हेरवाडे, उपायुक्त नानासाहेब कामठे, उपायुक्त समीर भूमकर, कार्यकारी अभियंता प्रदीप पाचंगे प्रकाश साटम, प्रभाग समिती जी च्या प्रभारी सहाय्यक आयुक्त मनाली शिंदे, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाचे ठेकेदार, सुमीत कुमार, वाहतूक विभागाचे पोलीस या पाहणी दौऱ्यात सहभागी झाले होते.



### १४ प्रमुख ठिकाणांची पाहणी

वासमारे पूल, सनशाईन हॉटेल जवळील नाला, न्यू फाऊंटन सिटी हॉटेल, कोहिनूर मार्बल जवळील नाला, सेल्फी ढाबा, कच्छ दरबार ढाबा, टीएनटीच्या बाजूचा नाला आदी १४ प्रमुख ठिकाणांची प्राधिकरण आणि महापालिकेच्या अधिकाऱ्यांनी पाहणी केली. यामध्ये पाणी वाहून जाण्याचे नैसर्गिक मार्ग बंद झालेले आढळून आले. अनेक ठिकाणी भराव होता. नाले अरुंद, त्याची साफसफाई नव्हती. तर अनेक ठिकाणी अतिक्रमणे होती.

### त्रिस्तरीय कृती आराखडा

- महामार्ग जलमय समस्या सोडवण्यासाठी त्रिस्तरीय कृती आराखडा तयार करण्यात आला आहे.
- नाले साफ करणे, आरसीसी पाईप, गटारे स्वच्छ करून घेणे, नाल्यांचे रुंदीकरण करणे,राडारोडा साफ करणे, पाणी जाण्याचे मार्ग मोकळे करणे, महामार्गाच्या रस्त्याच्या बाजून घर मारु घेणे, माती भराव असलेल्या जागा मोकळ्या करणे, उघाड्या (कल्व्हर्ट) तयार करणे आदी कामांचे नियोजन करण्यात आले.
- महामार्गाच्या हद्दीतील कामे करण्याचे निर्देश महापालिकेने महामार्ग प्राधिकरणाला दिले. तसेच पालिका हद्दीतील महामार्गालगतच्या नाल्यांची सफाई, कल्व्हर्ट तयार करणे आदी कामे महापालिकेकडून करण्यात येणार आहे. तात्काळ या कामांना सुरवात करण्यात आली आहे. यासाठी आवश्यकत ती यंत्रसामुग्री पुरविण्यात आली आहे. या कामांवर पालिकेचे अधिकारी लक्ष ठेवून काम करवून घेणार आहेत.
- ज्या जागा ग्रामपंचायतीच्या हद्दीत आहेत तेथे काम करण्यासाठी ग्रामपंचायतीकडे पत्रव्यवहार केला जाणार आहे. महामार्ग पाण्याखाली का जातो त्या कारणांचा शोध या पाहणी दौऱ्यात घेण्यात आला आणि त्यानुसार कामांची नियोजन करण्यात आले आहे.
- पाणी जाण्याचे मार्ग मोकळे करणे, नाल्यांचे रुंदीकरण करून साफसफाई करणे आदी कामांचा समावेश आहे, येत्या पावसाळ्यात महामार्गावरील जलभरावाची समस्या दूर केली जाणार आहे.

CS CamScanner

CS CamScanner

लोकसत्ता पृ. पान क्र. ०८

# अभियंताच क्रेडिट कार्ड चोर

## मौजमजा, जुगारासाठी चोरी

**लोकसत्ता वार्ताहर**

**गुन्हे वृत्त**

**भाईंदर :** क्रेडिट कार्ड चोरी करून लाखोंच्या रकमेवर डल्ला मारणाऱ्या एका सराईत चोराला भाईंदर पोलिसांच्या गुन्हे शाखेने अटक केली आहे. अर्जुन अरोरा असे या आरोपीचे नाव असून तो आयटी अभियंता आहे. मौजमजेसाठी तो ही चोरी करत होता. त्याच्यावर मुंबई, ठाण्यासह विविध पोलीस ठाण्यांत आठ गुन्ह्यांची नोंद आहे.

भाईंदरमध्ये राहणारे अमित अग्रवाल हे काही दिवसांपूर्वी खेळण्यासाठी टर्फमध्ये गेले होते. यावेळी त्यांच्या बॅगेतून मोबाइल व बँकेचे कार्ड चोरीला गेले होते. काही वेळेतच त्यांच्या नावावर असलेल्या क्रेडिट आणि डेबिट कार्डद्वारे ४ लाख ४ हजार लंपास करण्यात आले. याबाबत त्यांनी भाईंदर पोलीस ठाण्यात तक्रार देऊन गुन्हा नोंदवला होता.

याप्रकरणी भाईंदर पोलीस ठाण्याच्या गुन्हे प्रकटीकरण शाखेने तपास सुरू केला. पोलिसांनी घटनास्थळी असलेल्या सीसीटीव्ही कॅमेऱ्यात एक संशयित व्यक्ती त्यांना दिसून आला. अग्रवाल यांच्या मोबाइलचे लोकेशन हरियाणा येथे दाखवत होते. त्यानुसार पोलिसांनी पुढील तांत्रिक तपास करून हरियाणा येथील फरिदाबाद येथून ट्विकल अर्जुन अरोरा याला ताब्यात घेऊन अटक केली.

हा आरोपी उच्चशिक्षित आयटी इंजिनीअर असून केवळ जुगार आणि मौजमजा करण्यासाठी अशा चोऱ्या करत होता. त्याच्यावर यापूर्वी मुंबई, दिल्ली, पुणे शहरात आठ गुन्हे दाखल असल्याचे तपासात समोर आले आहे.

सदर गुन्ह्याचा तपास भाईंदर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सूर्यकांत नाईकवाड तसेच गुन्हे प्रकटीकरण पथकाचे पोलीस उपनिरीक्षक प्रसाद गोवले, रवींद्र भालेराव, राजेश श्रीवास्तव, किरण पवार, सुशील पवार, रामनाथ शिंदे, संजय चव्हाण आणि सलमान पटवे आदींच्या पथकाने केला आहे.

# माणिकपूर येथून वाहन चोराला अटक

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**वसई :** मोटारसायकल व ऑटो रिक्षा चोरी करणाऱ्या आरोपीला माणिकपूर पोलीस ठाण्याच्या गुन्हे प्रकटीकरण पथकाने अटक केली आहे. मोहम्मद सैबाज मोहम्मद हानिफ मनिहार (२४) असे या आरोपीचे नाव असून त्यांच्याकडून चार गुन्हे उघडकीस आणले आहेत.

वसई-विरार शहरात विविध ठिकाणच्या भागात वाहन चोरी होण्याच्या घटना वाढत आहेत. नुकतेच माणिकपूर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील नायगाव पश्चिमेच्या भागात दिलीपकुमार मकवाना यांनी रस्त्याच्या कडेला उभी केलेली दुचाकी चोरी झाली होती. याबाबत पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली होती. त्यानुसार माणिकपूर पोलिस ठाण्याच्या गुन्हे प्रकटीकरण शाखेच्या पथकाने मिळालेल्या माहितीच्या आधारे आरोपीला वसई पूर्वेच्या बावशेत पाडा येथून अटक केली आहे.

मोहम्मद सैबाज मोहम्मद हानिफ मनिहार असे या आरोपीचे नाव आहे. तीन मोटारसायकल, एक ऑटोरिक्षा असा दोन लाख रुपये किंमतीचा मुद्देमाल हस्तगत करून चार गुन्हे उघड केले आहेत. ही कारवाई वरीष्ठ पोलीस निरीक्षक राजू माने, पोलीस निरीक्षक (गुन्हे) संतोष चौधरी, गुन्हे प्रकटीकरण पथकाचे पोलीस उपनिरीक्षक सनिल पाटील, पोलीस हवालदार शैलेश पाटील, शामेश चंदनशिवे, धनंजय चौधरी, पोलीस शिपाई गोविंद लवटे, आनंदा गडदे व त्यांच्या पथकाने केली आहे.

# हत्या प्रकरणातील फरार आरोपीला अटक

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

**वसई :** १९९० मध्ये काशिमीरा येथे २२ वर्षीय तरुणाच्या झालेल्या हत्या प्रकरणातील फरार आरोपीला पकडण्यात मध्यवर्ती गुन्हे शाखेला यश आले आहे. तब्बल ३४ वर्षे हा आरोपी पोलिसांना गुंगारा देत होता. जहांगीर शेख असे या आरोपीचे नाव आहे.

अंधेरीच्या मरोळ येथे राहणाऱ्या मित्रांचा एक गट पार्टी करण्यासाठी काशिमीरा येथे आला होता. त्या वेळी गॅब्रिअल ऊर्फ सुधाकर अमन्ना याची हत्या झाली होती. या प्रकरणात पोलिसांनी पाच आरोपींना हत्येच्या प्रकरणात अटक केली होती. मात्र सहावा आरोपी जहांगीर शेख हा फरार होता. दरम्यान, पोलिसांनी या प्रकरणात दोषारोपपत्र दाखल केले आणि नंतर प्रकरणाचा तपास थंडावला होता. फरार आरोपी जहांगीर शेख हा मुंबईत रिक्षा चालवत असल्याची माहिती मध्यवर्ती गुन्हे शाखेचे पुष्पेंद्र थापा यांना मिळाली होती. त्यानुसार मध्यवर्ती गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अविराज कुराडे आणि त्यांच्या पथकाने शेख याला ताब्यात घेऊन अटक केली.

१९९० मध्ये आरोपी २५ ते ३० वर्षे वयोगटातील होते. पूर्ववैमनस्यातून ही हत्या करण्यात आली होती. आरोपी जहांगीर शेख आता ६१ वर्षांचा आहे. हत्येनंतर तो फरार झाला होता. अनेक वर्षे त्याने पोलिसांना चकमा दिला. नंतर तपास थंडावल्यानंतर तो पुन्हा मुंबईत आला.

# लाखोंचा मुद्देमाल प्रवाशाला परत

**वसई :** रिक्षात हरवलेली सोन्याचे दागिने व रोख रक्कम असलेली बॅग पेल्हार पोलिसांच्या गुन्हे प्रकटीकरण पथकाने शोधून काढली आहे. त्यात असलेले दागिने व रोख रक्कम असा एक लाख ५ हजार रुपयांचा मुद्देमाल पोलिसांनी प्रवाशाला सुपूर्द केला आहे.

१७ एप्रिल रोजी दुपारी २ च्या सुमारास नाजली अन्जुम अबुसाद अन्सारी ही महिला नालासोपारा स्थानक ते धानिवबाग असा प्रवास करत असताना सोन्याचे दागिने व रोख रक्कम असलेली बॅग रिक्षात विसरली होती. या बाबत नाजली यांनी पेल्हार पोलीस ठाण्यात तक्रार केली होती. पोलिसांना तक्रार मिळताच गुन्हे प्रकटीकरण शाखेच्या पथकाने तपास करून रिक्षाचा शोध घेऊन रिक्षात विसरलेली बॅग परत मिळविली आहे.

या बॅगेत सोन्याचे दागिने व रोख रक्कम असा १ लाख रुपये किमतीचा मुद्देमाल नाजली या महिलेकडे सुपूर्द केला आहे. हरवलेली दागिने व रोख रक्कम परत मिळवून दिल्याने प्रवासी महिलेने पोलिसांचे आभार मानले.

CamScanner


लोकसत्ता पु. पान. क्र. ०१

# उत्तनमध्ये पुन्हा बिबट्या

लोकसत्ता वार्ताहर

**भाईंदर :** उत्तन येथील खाडी गावात घराजवळ येऊन कोंबडीची शिकार करणारा बिबट्या सीसीटीव्ही कॅमेऱ्यामध्ये कैद झाला आहे.त्यामुळे संपूर्ण परिसरात भीतीचे वातावरण पसरले असून वन विभागाकडून बिबट्याचा शोध घेतला जात आहे.

भाईंदर पश्चिमेच्या उत्तन भागात मागील काही दिवसापासून बिबट्याचा वावर होत असल्याचे बोलले जात होते. मात्र प्रत्यक्षात हा बिबट्या कोणालाही दिसला नव्हता.दरम्यान रविवारी मध्यरात्री उत्तनच्या खाडी गावात राहणाऱ्या डीलॉन नामक व्यक्तीच्या घराच्या मागच्या बाजूला बिबट्या कोंबडीच्या शिकारीच्या शोधात असल्याचे सीसीटीव्ही कॅमेरात कैद झाले आहे.याबाबतची चित्रफीत समाज माध्यमांवर जलद गतीने वायरत होत असून स्थानिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे.याबाबत वनविभागाला तक्रार देण्यात आली असून बिबट्याला जेरबंद करण्याची मोहीम आखण्यात आली आहे.



## बिबट्या येण्यामागेचे कारण?

**भाईंदरच्या उत्तन भागात मागील दोन वर्षात तीन बिबटे आढळून आले आहेत. प्रामुख्याने टाळेबंदी काळात या भागात पहिला बिबटा आला होता. या बिबट्या पाठोपाठ अन्य बिबटे या मार्गाने प्रवास करून नंतर आले असल्याचा संशय आहे. तर हे बिबटे श्वान, मांजर आणि कोंबड्याची शिकार अधिक करत असल्यामुळे ते त्याचा शोधात येत असतात, अशी माहिती वन विभागाकडून सांगण्यात आले आहे.**

हमारा महानगर
epaper.hamaramahanagar.net
24 Apr 2024 - Page 3

# मोटरसाइकिल और ऑटो रिक्शा बरामद,एक गिरफ्तार



वसई। माणिकपुर थाने की क्राइम डिटेक्शन टीम ने मोटरसाइकिल और ऑटो रिक्शा चोरी के 4 मामलों का खुलासा करने और 2,00,000 का माल जब्त करने में सफलता हासिल की। यह कार्रवाई डीसीपी (सर्कल 2) व एसीपी पद्मजा बडे के मार्गदर्शन में माणिकपुर थाने के सीनियर पीआई राजु माने व पीआई संतोष चौधरी के नेतृत्व में क्राइम डिटेक्शन के पीएसआई सनिल पाटील की टीम ने की है। यह जानकारी पुलिस अधिकारी ने मंगलवार को दी है। पुलिस अधिकारी ने बताया कि,16 अप्रैल को दिलीप कुमार विजू मकवाना ने अपनी हीरो कंपनी स्ट्रीट मोटरसाइकिल नायगांव रेलवे स्टेशन पश्चिम में एक सार्वजनिक सड़क के किनारे खुले में पार्क की थी। इसी का फायदा उठाकर अज्ञात चोर ने उपरोक्त मोटरसाइकिल चोरी कर फरार हो गया। इस संबंध में माणिकपुर थाने में उपरोक्त शिकायतकर्ता ने अज्ञात चोर के खिलाफ शिकायत दर्ज कराई थी।

CamScanner

दैनिक
एक साथ प्रकाशित, पालघर, ठाणे, मुंबई,
# मुंबई केसरी टाइम्स
www.mumbaikesaritimes.com
वर्ष : 15 अंक : 16 बुधवार 24 अप्रैल 2024 मूल्य 2 रुपए Post-Reg- No. PLG/95/2020/2022 पृष्ठ : 04

# माणिकपुर पुलिस की कार्रवाई, मोटरसाइकिल व ऑटो रिक्शा के साथ एक आरोपी गिरफ्तार

वसई, माणिकपुर थाने (मीरा भाईंदर वसई विरार पुलिस आयुक्तालय) की क्राइम डिटेक्शन टीम ने



मोटरसाइकिल और ऑटो रिक्शा चोरी के 4 मामलों का खुलासा करने और 2,00,000 का माल जब्त करने में सफलता हासिल की।यह कार्रवाई डीसीपी (सर्कल 2) व एसीपी पद्मजा बडे के मार्गदर्शन में माणिकपुर थाने के सीनियर पीआई राजु माने व पीआई संतोष चौधरी के नेतृत्व में क्राइम डिटेक्शन के पीएसआई सनिल पाटील की टीम ने की है।यह जानकारी पुलिस अधिकारी ने मंगलवार को दी है।पुलिस अधिकारी ने बताया कि,16 अप्रैल को दिलीप कुमार विजू मकवाना (43) ने अपनी हीरो कंपनी स्ट्रीट मोटरसाइकिल नायगांव रेलवे स्टेशन पश्चिम में एक सार्वजनिक सड़क के किनारे खुले में पार्क की थी।इसी का फायदा उठाकर अज्ञात चोर ने उपरोक्त मोटरसाइकिल चोरी कर फरार हो गया। इस संबंध में माणिकपुर थाने में उपरोक्त शिकायतकर्ता ने अज्ञात चोर के खिलाफ शिकायत दर्ज कराई थी,जिसमे माणिकपुर थाने ने कलम 379 के तहत अपराध दर्ज किया था।पुलिस अधिकारी ने कहा कि,माणिकपुर पुलिस स्टेशन के क्राइम डिटेक्शन दस्ते के अधिकारी और कर्मचारी ने सीसीटीवी फुटेज व गुप्त मुखबिर और तकनीकी सहायता की मदद से अभियुक्त मोहम्मद सैबाज मोहम्मद हानिफ मनिहार (उम्र 24 वर्ष,निवासी- तुलसी नगर चाल,टेकडी मस्जिद के बगल में,बावशेतपाडा,वसई पूर्व ) को उसके आवास परिसर में जाल बिछाकर पकड़ लिया गया और उसे गिरफ्तार किया गया है।पुलिस अधिकारी ने कहा कि,विवेचना के दौरान गिरफ्तार अभियुक्त से 2,00,000 कीमत की 3 मोटरसाइकिल एवं 1 ऑटो रिक्शा बरामद किया गया एवं 4 अपराध सुलझाये गये।

CS CamScanner

यशोभूमि

महाराष्ट्र

# 34 साल से फरार हत्या का आरोपी अंधेरी से गिरफ्तार

**यशोभूमि / प्रतिनिधि**

**मीरा रोड।** कानून के कुछ जानकारों ने सच ही कहा है कि कानून के हाथ बहुत लम्बे होते हैं, किये हुए जुर्म को गुनहगार कुछ समय तक छिपा सकता है, परन्तु एक दिन उसका किया जुर्म ही गवाही देगा और फिर गुनहगार होगा कानून की गिरफ्त में। इसी तरह हत्या के एक मामले में वांछित आरोपी को लगभग 34 साल बाद मीरा-भाईंदर वसई-विरार पुलिस आयुक्तालय की क्राइम ब्रांच (यूनिट 1) की टीम ने अंधेरी से गिरफ्तार किया है। पुलिस से मिली जानकारी के अनुसार घटना की पूरी कहानी यह है कि हत्या का मुख्य साजिशकर्ता स्टिव डेविड रिश्ते में मृतक गैब्रियल अमन्ना का सगा जीजा था और स्टिव अपनी पत्नी यानि गैब्रीयल की बहन को आए दिन प्रताड़ित करता था, जिसका कड़ा विरोध मृतक गैब्रियल ने किया था, तभी से जीजा अपने साले से बदला लेने की फिराक में था। चूंकि अमन्ना परिवार का एक फ्लैट काशीमिरा के मीरा गांव में भी था और मृतक के भाई की शादी तय हो गई थी, जिसके उपलक्ष्य में अमन्ना परिवार ने मीरा गांव स्थित अपने फ्लैट में 2 दिसम्बर 1990 को एक पारिवारिक समारोह रखा था, जिसमें स्टिव डेविड को भी आमंत्रित किया गया था। और फिर चल रही पार्टी के दौरान शराब के नशे में उसने अपनी पत्नी के साथ गाली गलौज करने के साथ ही गैब्रियल के भाई के साथ भी मारपीट की तभी बीच-बचाव करने आए गैब्रियल पर स्टिव और उसके साथियों ने अपने साथ लाए हुए धारदार हथियारों से हमला कर उसे बुरी तरह जख्मी कर भाग गये थे।



CamScanner

DIGITAL
मुंबई, बुधवार, 24 अप्रैल 2024
प्रवासी संदेश
PRAVASI SANDESH
www.pravasisandesh.news
9004746488 pravasisandesh1@gmail.com www.facebook/ pravasisandesh1/

# पेल्हार पुलिस ने मालिकों को उनके चोरी-खोये हुए 20 मोबाईल फोन को लौटाया

## चेहरे पर दिखी रौनक, सभी ने कहा धन्यवाद

■ **प्रवासी संदेश टीम।**

**वसई।** मोबाईल आज मानव जीवन का अभिन्न हिस्सा बन गया है। एक बार मोबाइल फोन खो जाए तो उसके वापस मिलने की उम्मीद छोड़ दी जाती है। क्योंकि नागरिक को लगता है इतनी बड़ी आबादी में पुलिस कैसे पता लगा पायेगी, लेकिन टेक्नोलॉजी इतनी विकसित हो गई है कि अब उसके सामने कुछ भी असंभव नहीं है। इसी टेक्नोलॉजी की मदद से पेल्हार पुलिस ने चोरी और खोए हुए 20 मोबाइल फोन की तलाश कर मंगलवार की सुबह उसे उनके मालिकों को वापस लौटाया है। पेल्हार स्टेशन क्षेत्र में पिछले कुछ दिनों में मोबाइल चोरी की घटनाएं बढ़ी हैं। चोरी के साथ-साथ खोए हुए मोबाइल को ट्रेस करना भी पुलिस के लिए बड़ी चुनौती है। पेल्हार पुलिस की अपराध शाखा की पुलिस ने लाखों रुपए कीमत के कुल 20 मोबाइल फोन को बरामद किया है। मंगलवार सुबह पुलिस स्टेशन में आयोजित एक कार्यक्रम के दौरान परिमंडल तीन के पुलिस उपायुक्त जयंत भजबले ने सभी



मोबाइलों को उनके मालिकों को वापस दे दिया है। इस अवसर पर उन्होंने उपस्थित नागरिकों को साइबर क्राइम, मोबाइल चोरी से कैसे बचा जाए और मोबाइल व डेटा को कैसे सुरक्षित रखा जाए, इस पर मार्गदर्शन किया। मोबाइल वापस मिलने के बाद कई लोगों के चेहरे पर संतुष्टि दिखी, लोगों ने पुलिस को धन्यवाद दिया है।

CS CamScanner

DIGITAL
# प्रवासी संदेश
PRAVASI SANDESH
मुंबई, बुधवार, 24 अप्रैल 2024
www.pravasisandesh.news
9004746488 pravasisandesh1@gmail.com www.facebook/ pravasisandesh1/

# एंटी नारकोटिक्स सेल-तुलींज पुलिस ने जब्त किया 14 लाख का एमडी ड्रग्स

## दो आरोपी गिरफ्तार, बेचने के लिए रखी थी दवाई



■ **प्रवासी संदेश टीम।**

**नालासोपारा।** एंटी नारकोटिक्स सेल और तुलिंज पुलिस ने नालासोपारा पूर्व के अलग-अलग इलाकों में 14 लाख से ज्यादा एम.डी. ड्रग्स की बड़ी खेप बरामद की है और दो आरोपियों को गिरफ्तार किया है। नालासोपारा पुलिस स्टेशन और तुलिंज पुलिस स्टेशन ने दोनों आरोपियों के खिलाफ एनडीपीएस एक्ट के तहत मामला दर्ज कर लिया गया है और आगे की जांच जारी है।

लाखों की नशीली दवाएं बरामद प्राप्त जानकारी के अनुसार गुप्त सूचना के आधार पर तुलिंज थाना पुलिस ने प्रगति नगर, हाईटेंसन रोड, नालासोपारा पूर्व स्थित एक 29 वर्षीय व्यक्ति को एम.डी. ड्रग्स के साथ हिरासत में लिया। पुलिस ने बताया कि शख्स के पास से 53.69 ग्राम वजनी एम.डी. ड्रग्स बरामद किया गया है, जिसकी कुल कीमत 5,36,900 रुपये आंकी गई है। पुलिस ने बताया कि उक्त व्यक्ति ने उक्त नशीली दवाएं बेचने के लिए रखी थी। हालांकि, शख्स शाबान अहमद हुसैन आलम को पकड़ लिया गया है।

तुलिंज पुलिस स्टेशन के सीनियर पीआई शैलेन्द्र नागरकर ने बताया कि उक्त व्यक्ति के खिलाफ तुलिंज पुलिस स्टेशन में एनडीपीएस एक्ट के तहत मामला दर्ज कर उसे कोर्ट में पेश किया गया, जहां कोर्ट ने उसे 25 अप्रैल तक पुलिस हिरासत में रखने का आदेश दिया है। दूसरा मामला; एंटी नारकोटिक्स सेल की टीम ने नालासोपारा पश्चिम क्षेत्र के फनफिस्टा रोड स्थित एक 34 वर्षीय व्यक्ति (मलिक मजरुद्दीन हुसैन) के पास से 44 ग्राम वजनी एम.डी.ड्रग्स/मेफेड्रोन (मूल्य 8,80,000 रुपये) बरामद किया है।

गिरफ्तार आरोपी पश्चिम बंगाल का मूल निवासी है। पुलिस ने बताया कि, उक्त अपराध को अंजाम देने में उसने बजाज पल्सर मोटरसाइकिल का उपयोग किया। व्यक्ति को उक्त नशीली दवाएं बेचते हुए पकड़ा गया है। फिलहाल आरोपी नालासोपारा पश्चिम थाने में एनडीपीएसएक्ट के तहत मामला दर्ज कर लिया गया है। कार्रवाई में पुलिस ने कुल 14,16,900 रुपये की एमडी ड्रग्स बरामद की है।

CamScanner